संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## सांस्कृतिक महोत्सवामुळे जीवनात आनंद - कुलगुरू

## विद्यापीठात इंडिया इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हलचे उद्घाटन

अमरावती.

वर्तमानकाळात धकाधकीच्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये सुलभता, प्रसन्नता निर्माण व्हावी, आनंद मिळावा, यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम महत्वाचे आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, आय.आय.डी.एफ. फॉऊन्डर-सांस्कृतिकी, भुवनेश्वर आणि कलाशिखर फॉऊन्डेशन, अमरावतीचे संयुक्त विद्यमाने आयोजित इंडिया इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल सगळ्यांना आनंद देईल, असे मत कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर आय.आय.डी.एफ. सांस्कृतिकी, भुवनेश्वरचे महोत्सव निर्देशक श्री शामहरी चक्रा, कलाशिखर फॉऊन्डेशन, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. भैयासाहेब मेटकर, सचिव ॲड. शितल मेटकर, ऑडिसी नृत्य गुरू तथा हेमंत नृत्य कला मंदिर, अमरावतीचे सचिव डॉ. मोहन बोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, रशियाच्या सुप्रसिद्धी ओडिसी नृत्यांगणा विटालीना लोबच, सोफया कुखारीनोक उपस्थित होते.

फेस्टिव्हलचे उद्घाटन झाल्याची घोषणा कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केली व पुढे म्हणाले, अशा प्रकारच्या कार्यक्रमाची विद्यापीठाचा घटक म्हणून आम्ही वाट पाहत होतो. चांगली मेजवाणी, आनंद या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वांना मिळणार आहे. वातावरण बदलू शकते, असा हा कार्यक्रम आहे. आनंदी वातावरणात जगण्याची संधी या निमित्ताने सर्वांना प्राप्त झाली आहे. यापूर्वी सुद्धा विद्यापीठाने लोककला महोत्सव, आदिवासी नृत्य अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा कार्यक्रम विद्यापीठात घेण्याची संधी आयोजकांनी दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

डॉ. भैयासाहेब मेटकर मनोगतात म्हणाले, आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने डान्स फेस्टिव्हलचे आयोजन यशस्वीरित्या विद्यापीठात होत आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर आणि सर्वच अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी दिलेल्या मार्गदर्शनातून व सहकार्यातून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कार्यक्रम विद्यापीठात फॉऊन्डेशनला आयोजित करता आला, याचा मनस्वी आनंद होत आहे.

संत गाडगे बाबांच्या प्रतिमेच्या पूजनाने सुरु झालेल्या कार्यक्रमामध्ये वृक्ष व पुस्तक देवून अतिथींचे स्वागत करण्यात आले. सुप्रसिद्ध ओडिसी नृत्यांगणा ॲड. शितल मेटकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. याप्रसंगी पंडित दाताराजजी बोडे यांचे विदर्भातील प्राचीन मंदिरावरील नृत्यशिल्प या विषयावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संचालन सौ. क्षिप्रा मानकर यांनी, तर आभार ॲड. शितल मेटकर यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला माजी कुलगुरू डॉ.जी.व्ही. पाटील, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, डॉ. रविंद्र सरोदे, शहरातील विविध शाळा/महाविद्यालयांचे विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रशियाच्या नृत्यांगणीने वेधले सर्वांचे लक्ष

रशियाच्या सुप्रसिद्ध ओडिसी नृत्यांगणा सोफया कुखारीनोक यांनी सोलो प्रकारात उत्कृष्टरितीने ओडिसी नृत्य सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध करुन सर्वांचे लक्ष वेधले.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०५/०२/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी